सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २३/१२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.आय एस एस-०८१७/प्र.क्र.३६०/वि शा-४, दि.२० डिसेंबर-२०२४

**विषय :-** फोर्स वन, महाराष्ट्र राज्य,मुंबई मुख्यालयासाठी मेससाठी प्रमुख स्वयंपाकी, सहाय्यक स्वयंपाकी भोजनसेवक अशी १५ व साफसफाईसाठी २० सफाई कर्मचारी यांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.आय एस एस-०८१७/प्र.क्र.३६०/वि शा-४, दिनांक २० डिसेंबर-२०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२१२०१६३००३५०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).

अपर पोलीस महासंचालक ,फोर्स वन,महाराष्ट्र राज्य ,मुंबई

कार्यासन अधिकारी का.क्र.८-अ, २६-ब

प्रत :-

अपर पोलीस महासंचालक (प्रशासन.),महाराष्ट्र राज्य ,मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन.) महाराष्ट्र राज्य ,मुंबई

प्रत:-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**फोर्सवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई मुख्यालयासाठी मेससाठी प्रमुख स्वयंपाकी, सहाय्यक स्वयंपाकी भोजनसेवक अशी १५ व साफसफाईसाठी २० सफाई कर्मचारी यांची सेवा बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने घेण्यासाठी व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : आयएसएस- ०८१७/ प्र.क्र.३६०/विशा-४.**
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुख्य इमारत, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २० डिसेंबर, २०२४.

**वाचा :-** १. गृह विभाग, शासन निर्णय क्र.आयएसएस-०८१७/प्र.क्र.३६०/विशा-४, दिनांक २२ ऑक्टोबर, २०१८

२. गृह विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.आयएसएस-०८१७/प्र.क्र.३६०/विशा-४, दिनांक ०७ डिसेंबर, २०१८

३. गृह विभाग, शासन निर्णय क्र.आयएसएस-०८१७/प्र.क्र.३६०/विशा-४, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९

४. गृह विभाग, शासन निर्णय क्र.आयएसएस-०८१७/प्र.क्र.३६०/विशा-४, दिनांक १३ ऑगस्ट, २०१८

५. गृह विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.आयएसएस-०८१७/प्र.क्र.३६०/विशा-४, दिनांक ०७.०६.२०२१.

६. गृह विभाग, शासन निर्णय क्र.आयएएस-०८१७/प्र.क्र. ३६०/विशा-४, दिनांक ३१ डिसेंबर, २०२१.

७. अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि.१९.०३.२०२४ चे पत्र.

८. विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक २६.०४.२०२४ चे पत्र सहपत्रासह.

९. गृह विभाग, शासन पत्र क्र.आयएसएस-०८१७/प्र.क्र.३६०/विशा-४, दि.३१.०७.२०२४.

१०. अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक २०.०९.२०२४ चे पत्र.

११. विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, मुंबई यांचे दिनांक ०१.१०.२०२४ चे पत्र सहपत्रांसह

**प्रस्तावना:-**

फोर्स वन, मुंबई पथकाची स्थापना हि दहशतवादी कारवाईस प्रतिबंधाकरिता करण्यात आलेली आहे. मा.पंतप्रधान यांची महाराष्ट्र राज्य भेट, विधानसभा अधिवेशन, नागपूर तसेच अतिसंवेदनशील ठिकाणी फोर्स वन मधील अधिकारी व कमांडो यांना सुरक्षा बंदोबस्ताकरिता तैनात रहावे लागते. तसेच अखिल भारतीय कमांडो स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्त्व करणेकरिता फोर्स वन मधील अधिकारी व कमांडो यांचा सहभाग असतो. वरील नमूद सर्व ठिकाणी फोर्स वन मधील अधिकारी व कमांडो यांच्यासोबत जेवणाची तसेच साफसफाईची व्यवस्था करणेकरिता मुख्यालयामधून मेस कर्मचारी व साफसफाई कर्मचारी सोबत पाठविण्यात येतात. सदर सुरक्षा बंदोबस्त व क्रिडा स्पर्धेचा कालावधी हा मोठा असल्याने मुख्यालयात मेस व साफसफाई कर्मचारी यांची कमतरता भासते व मुख्यालयातील उर्वरित मेस व साफसफाई कर्मचारी यांच्यावर कामाचा अधिक भार पडतो व कामाची पूर्तता वेळेत होत नाही. त्यामुळे इतर अधिकारी व कमांडो यांची गैरसोय होते व त्यांच्यावर मानसिक व शारिरीक ताण येतो.

२. त्याअनुषंगाने फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुख्यालयासाठी साफसफाईसाठी १५ सफाई कर्मचारी व मेससाठी प्रमुख स्वयंपाकी/ सहाय्यक स्वयंपाकी/ भोजन सेवक अशी १० कर्मचा-यांची सेवा बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने घेण्याकरिता संदर्भीय शासन निर्णयांव्दारे वेळोवेळी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार गृह विभाग, शासन निर्णय क्र.आयएएस-०८१७/प्र.क्र. ३६०/विशा-४, दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ अन्वये दिनांक १६.१०.२०२१ ते दिनांक १५.१०.२०२४ या कालावधीसाठी १० मेस कर्मचारी व १५ सफाई कर्मचारी अशा प्रकारे एकूण २५ कर्मचारी यांची सेवा बाहययंत्रणेव्दारे घेण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

३. सदर त्रैवार्षिक कराराची मुदत दिनांक १५.१०.२०२४ रोजी संपुष्टात आली असल्यामुळे फोर्स वन, मुंबई मुख्यालयासाठी मेससाठी ३ प्रमुख स्वयंपाकी, ६ सहाय्यक स्वयंपाकी व ६ भोजनसेवक अशी एकूण १५ कर्मचारी व साफसफाईसाठी २० साफसफाई कर्मचारी यांची सेवा पुरविण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया फोर्स वन, मुंबई कार्यालयामार्फत राबविण्यात आली. त्यानुसार १५ मेस कर्मचारी यांचे सेवा पुरविण्याकरिता मे.अमेय इंटरप्राईजेस व २० साफसफाई कर्मचारी यांची सेवा पुरविण्याकरिता मे.समता फॅसिलिटी प्रा.लि. या पात्र ठरलेल्या या पुरवठादारास सन २०२४-२०२७ या कालावधीकरिता १५ मेस कर्मचारी व २० साफसफाई कर्मचारी यांची सेवा पुरविण्यासाठी वार्षिक खर्च रु.७३,१०,६८८/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती. त्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णयः-** फोर्सवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या मुख्यालयासाठी दिनांक १६.१०.२०२४ ते दिनांक १५.१०.२०२७ या कालावधीकरिता मे.अमेय इंटरप्राईजेस यांचेकडून बाहययंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने मेससाठी ३ प्रमुख स्वयंपाकी, ६ सहाय्यक स्वयंपाकी व ६ भोजनसेवक अशी एकूण १५ कर्मचा-यांच्या सेवेसाठी व मे.समता फॅसिलिटी सर्विसेस प्रा.लि. यांचेकडून साफसफाईसाठी २० सफाई कर्मचा-यांची सेवा घेण्यास व त्सासाठी येणा-या खर्चापोटी एकूण रु.७३,१०,६८८/- (त्र्याहत्तर लाख दहा हजार सहाशे अठ्ठयाऐंशी फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर खर्चाचे विवरणपत्र पुढीलप्रमाणे आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>पदांचे नांव</th><th>पदांची संख्या</th><th>एका पदाचे मासिक वेतन</th><th>एकूण पदांचे मासिक वेतन</th><th>१५ पदांचे वार्षिक वेतन</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रमुख स्वयंपाकी</td><td>३</td><td>रु.२४,१८९.४१०/-</td><td>रु.७२,५६८/-</td><td rowspan="4">रु.३,१३,२२४ x १२ = रु.३७,५८,६८८/-</td></tr>
<tr><td>२</td><td>सहाय्यक स्वयंपाकी</td><td>६</td><td>रु.२१,२४०/-</td><td>रु.१,२७,४४०/-</td></tr>
<tr><td>३</td><td>भेजन सेवक</td><td>६</td><td>रु.१८,८६९.३८०/-</td><td>रु.१,१३,२१६/-</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>१५</td><td></td><td>रु.३,१३,२२४/-</td></tr>
</table>

| अ.क्र. | पदांचे नांव | पदांची संख्या | एका पदाचे मासिक वेतन | एकूण पदांचे मासिक वेतन | २० पदांचे वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | साफसफाई कर्मचारी | २० | रु.१४,८००/- | रु.२,९६,०००/- | **रु.२,९६,००० x १२ = रु.३५,५२,०००/-** |

२. सदरचा खर्च “२०५५-पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल (२०५५०१६८) कंत्राटी सेवा-१०” या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२०२५, सन २०२५-२०२६, सन २०२६-२०२७ व सन २०२७-२०२८ या आर्थिक वर्षात मंजूर होणा-या अनुदानातून भागविण्यात येईल.

३. याकरिता पोलीस अधीक्षक, फोर्सवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण प्राधिकारी म्हणून आणि त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. याबाबतच्या शासन निर्णयास वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-चार मधील, अ.क्र.११ मधील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अटीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१२२०१६३००३५०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN SAHEBRAO DHIKALE

Digitally signed by PRAVIN SAHEBRAO DHIKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=6d1bb8a730bc70c2cbcd0b01bab78ae17bc671feb580bcbbcd692fb0650b8855, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5958E733FEF41BD5DDD91B20A6E0AC739E081BB933D0189686449BE15147182, cn=PRAVIN SAHEBRAO DHIKALE
Date: 2024.12.20 16:32:01 +05'30'

**( प्रविण सा. ढिकले )**
**कक्ष अधिकारी, गृह विभाग**

**प्रति,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३) विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्सवन, महाराष्ट्र राज्य, गोरेगांव, मुंबई-४०० ०९८.
४) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
५) महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
६) अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८) वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई.
९) कार्यासन बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती- विशा-४, गृह विभाग.